# शीर्षकः ॲसिड पीडितांना आता पाच लाख रुपयांची मदत

## मुख्यमंत्री फडणवीस - महिला आयोगाला सर्वकष धोरण आखण्याची सूचना

**मुंबई-** ॲसिड हल्यातील पीडितांना आता तीन लाखांऐवजी पाच लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय आज कॅबिनेट बैठकीत घेण्यात आला आहे. आता खऱ्या अर्थाने समाजाने या पीडतांसोबत उभे राहण्याची हीच वेळ आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले. राज्य महिला आयोगाने ॲसिड पीडितांविषयी सर्वकष धोरण तयार करावे, राज्यशासन या धोरणाला निधी, कायदा अशा सर्व स्वरुपांत मदत करेल, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि 'दिव्यज् फाऊंडेशन' आयोजीत 'सक्षमाः कॉन्फिडन्स वॉक' हा कार्यक्रम वरळीतील 'नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया' येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. ते म्हणाले, ॲसिडहल्ला हा शरीरावर नसून त्या व्यक्तीच्या मनावरील हल्ला असतो. समाजातील प्रत्येक घटकाने वेळ, पैसा, सहभाग अशा कोणत्याही स्वरूपाचे योगदान देऊन त्यांची जगण्याची इच्छा प्रेरित केली पाहिजे. ॲसिड हल्ल्यातील आरोपींच्या शिक्षेचे स्वरुप अधिक कठोर करण्यात येईल, त्यासाठी कायद्यातही आवश्यक तरतूद करण्यात येईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यानी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस, मुंबईचे पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर, महानगरपालिका आयुक्त अजय मेहता, महिला विकास व बाल कल्याणमंत्री पंकजा मुंडे-पालवे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, यु.एस.के. फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. उषा काकडे, 'लोकमत' वृत्तपत्र समूहाच्या एडिटोरिअल बोर्डाचे चेअरमन विजय दर्डा, अभिनेता विवेक ऑबेरॉय, दिग्दर्शक सुभाष घई, मेघना घई, अभिनेत्री सोनाली बेंद्रे या मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून सोहळयाचा आरंभ केला.

मनोगत व्यक्त करताना अमृता फडणवीस म्हणाल्या, ॲसिड हल्ल्यातील पीडित हे 'पीडित' नसून आयुष्याच्या संघर्षात लढणारे खरेखुरे 'योध्दे' आहेत. त्यांचे केवळ पुनर्वसन न करता त्यांना 'सक्षम' करणे हे आपले ध्येय आहे. याकरिता, समाजातील प्रत्येकाने योगदान देणे महत्वाचे आहे. या माध्यमातून ही सुरुवात झाली असून, प्रत्येक घटकाचा पाठिंबा आवश्यक आहे. यासबंधींच्या कायद्यात महत्वाच्या दुरुस्ती करून अंमलबजावणी झाली पाहिजे, अशीही मागणी फडणवीस यांनी केली.

## चौकटः नोकरी, घर आणि बरचं कांही...

अभिनेता विवेक ऑबेरॉय याने आपल्या 'कर्म' या कंपनीच्या माध्यमातून ललिता या ॲसिड हल्ल्यातील पीडितेला आपल्या 'प्रॉडक्शन हाऊस' मध्ये नोकरी दिल्याचे जाहीर केले. तसेच ललिता सध्या भाडयाच्या घरात राहते. ललीताचा लहान भाऊ तिच्या काळजीसाठी सतत खूप धडपड करत असतो. तरीही अशा परिस्थितीत ललिताची जगण्याची जिद्द लक्षात घेऊन विवेकने तिला हक्काचे घरही देत असल्याचे जाहीर केले. तसेच, या सोहळयात ॲसिड हल्ल्यातील आणखी दोन पीडितांना पोलीस दलात नोकरी मिळत असल्याचे सूत्रसंचालकांनी जाहीर केले.

### १. दिग्गजांनी केला 'ॲसिड व्हिक्टर्स' सोबत कॉन्फिडन्स वॉक

या सोहळयात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी 'ॲसिड व्हिक्टर्स' सोबत कॉन्फिडन्स वॉक केला. त्यात शब्बो अभिनेत्री जुही चावला, चांदनी-पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर, अलिना-दिविजा आणि अमृता फडणवीस, रेश्मा शेख -अभिनेत्री साक्षी तन्वर, ललिता-अभिनेता विवेक ऑबेरॉय, मबिया-महाराष्ट्र राज्य महिला आयोग अध्यक्षा विजया रहाटकर यांचा समावेश होता.

### २. 'अलग मेरा ये रंग है' ची गुंज

ॲसिड हल्ल्यातील पीडितांसोबत चित्रित केलेल्या 'म्युझिक व्हिडिओ' यावेळी दाखवण्यात आला. अभिजीत जोशी लिखित 'अलग मेरा ये रंग है' हे गाणे स्वतः अमृता फडणवीस यांनी गायले आहे. या व्हिडिओमध्ये अमृता फडणवीस यांच्यासोबत ॲसिड हल्ल्यातील पीडितांचाही सहभाग आहे. या व्हिडीओचे दिग्दर्शन संतोष मांजरेकर यांनी केले आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून ॲसिड हल्ल्यातील पीडितांना सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि जगण्याचे बळ देण्याचे उद्देश आहे.

**फोटो ओळीः** सोहळयाच्या सुरुवातील महिला विकास व बालकल्याणमंत्री पंकजा मुंडे-पालवे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, 'लोकमत' वृत्त समूहाच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन विजय दर्डा, अभिनेता विवके ऑबेरॉय, काकडे समूहाच्या उषा काकडे आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.